सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, JALGAON
(An Autonomous Institute of Government of Maharashtra)
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव
( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )
National Highway 53, Jalgaon-425002 | राष्ट्रीय महामार्ग ५३, जळगाव-४२५००२
Phone: (0257) 2281522,2280531,2280534 | फोन (०२५७) २२८१५२२,२२८०५३०,२२८०५३४
Email: principal.gcoejalgaon@dtemaharashtra.gov.in Website: www.gcoej.ac.in

जा. क्र.: शाअमज/ ससा /२०२५/45 दिनांक: 6 JAN 2025

**कार्यालयीन पत्र**

विषय :- उपहारगृह कंत्राटी जाहिराती बाबत

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की सोबत जोडलेल्या कंत्राटी उपहारगृह निविदे बाबत पृष्ट क्र १ ते ९ दस्तावेज दिनांक ७/१/२००५ रोजी स्थानिक वत्तपत्रात प्रसिध्द करून संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

06/01/2025

(डॉ. सुहास सुधाकरराव गाजरे)
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव

प्रत १ प्रभारी वृत्तपत्र जाहिरात प्रसिध्द अधिकारी यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

(1)

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था तथा नॅक प्रमाणित संस्था)
राष्ट्रीय महामार्ग क्र. ६, जळगांव-४२५००२०

सत्यमेव जयते

फोन क्र. ०२५७-२२८१५२२ फॅक्स क्र. ०२५७-२२८१३१९
Website : www.gcoej.ac.in E-mail - princoej@rediffmail.com

जा.क्र. शाअमज/ससा/२०२५/26 दिनांक 13 JAN 2025

## उपहारगृह कंत्राट जाहीरात

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव येथील उपहारगृह चालविण्याचे कंत्राट देण्याकरिता दरपत्रके दिनांक २२.०१.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत. यासंबंधीचे विस्तृत माहिती, अटी व शर्ती या महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.gcoej.ac.in व सुचनाफलक यावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी महाविद्यालयाच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेटून किंवा संकेतस्थळावरुन माहिती घेउन विहित मुदतीत सिलबंद निविदा कार्यालयात सादर करावी. उशिरा आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

03/01/2025

(डॉ.सुहास सुधाकरराव गाजरे)
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
जळगांव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, JALGAON
(An Autonomous Institute of Government of Maharashtra)
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव
( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )
National Highway 53, Jalgaon-425002 | राष्ट्रीय महामार्ग ५३, जळगाव-४२५००२
Phone: (0257) 2281522,2280531,2280534 | फोन (०२५७) २२८१५२२,२२८०५३०,२२८०५३४
Email: principal.gcoejalgaon@dtemaharashtra.gov.in Website: www.gcoej.ac.in

जा. क्र.: शाअमज/ससा /२०२५/45 दिनांक: - 6 JAN 2025

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव, या संस्थेतील आवारात उपहारगृह कंत्राटी तत्वावर देण्या बाबतच्या अटी व शर्ती व इतर आवश्यक माहिती :-

## अटी व शर्ती

१) सदर कंत्राट हे अकरा महिने करिता असुन सदर कंत्राट पुढील वर्षी चालू ठेवणे वा बंद करणे यासंबंधीचे सर्व अधिकार महाविद्यालयाकडे असतील. तथापि काही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास अथवा उपहारगृहाचा दर्जा / गुणवत्ता समाधानकारक नसल्यास सदर कंत्राट एक महिन्याच्या पूर्वसूचनेने संपुष्टात येईल व त्यास कंत्राटदार जबाबदार राहील.

२) कोणत्याही परिस्थितीत कंत्राटदारास एक वर्षभर उपहारगृहाचे दर बदलता येणार नाहीत. तसेच महाविद्यालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय मध्येच उपहारगृह बंद करता येणार नाही.

३) सदर उपहारगृह महाविद्यालयाच्या परीसरात असुन महाविद्यालयाच्याच विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी असल्याने कंत्राटदारासनाममात्र भाडे रू. ६,०००/- प्रति माह या दराने उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच वापरलेल्या विजेची रक्कम विहीतदराप्रमाणेकंत्राटदारास भरावी लागेल.

४) महाविद्यालयात अनामत रक्कम रू. ५०,०००/-कंत्राटदारास जमा करावी लागेल. याबद्दल महाविद्यालयात उपलब्ध असलेली फर्निचर कंत्राटदारास वापरण्यास देण्यात येईल.

५) उपहारगृहात बालकामगाराची नियुक्ती करता येणार नाही. कंत्राटदाराने शासनाचे कामगार विषयक सर्व कायदे व अधिनियम पाळणे बंधनकारक राहील. तसेच उपहारगृहात नियुक्त करण्यात येणारे कर्मचारी प्रामाणिक, विश्वासू, शारीरिक दृष्टया सक्षम व अनुभवी असल्याची तसेच त्यांचे विरूध्द कोणत्याची स्वरूपाच्या गुन्हयाची नोंद पोलीस स्टेशनला नाही अशी खात्री कंत्राटदाराने करूनच अशाच कर्मचा-यांची नेमणूक करणे आवश्यक राहील. सर्व कामगारांची माहिती रंगीत छायाचित्रासह संस्थेत जमा करावी लागेल. तसेच त्यांचे फोटो असलेले ओळखपत्राच्या सत्यप्रती जमा कराव्या लागतील. नेमणूक करण्यात आलेल्या उपहारगृहातील कामगारांनी मद्यपान न करणे, नशा न करणे व गैरवर्तणूक न करणे याकरिता बांधिल राहतील, अशा प्रकारचे

गैरवर्तन आढळल्यास अशा कामगारांना दंड ठोठावून त्यांच्या सेवा तात्काळ बंद करण्यात येतील. नियुक्ती कामगारांच्या व्यतिरिक्त इतर कोणासही उपहारगृहात थांबता येणार नाही.

६) सदर कंत्राटा दरम्यान कंत्राटदाराच्या खानावळीतील कर्मचारी/कामगारास काम करीत असतांना त्यांच्या जिवितास काही हानी / इजा / दुखापत / नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. संस्था कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. कंत्राटदाराच्या कर्मचारी/ कामगारांच्या निष्काळजीपणामुळे उपहारगृहातील वस्तु तथा साहित्याचे नुकसान झाल्यास किंवा चोरी झाल्यास त्याची भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील.

७) सदरच्या कंत्राट कालावधीमध्ये, कंत्राट पध्दतीवरील नेमणूकी बाबत शासनाची काही वेगळी धोरणे /निर्णयठरल्यास आवश्यक असल्यास कंत्राट कालावधी संपण्यापूर्वी संपुष्टात आणण्याचे अधिकार यामहाविद्यालयाच्या प्राचार्यांना राहतील.

८) उपहारगृहात आरोग्यदायक स्वच्छता ठेवण्याची व खानावळीत सर्व कामगारांच्या नियमित वैद्यकीय तपासणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

९) कंत्राटदारास उपहारगृहात तक्रार/सुचना नोंदवहीठेवणे बंधनकारक राहील. उपहारगृहात विडी /सिगारेट/गुटखा व तत्सम वस्तु विक्रिस ठेवता येणार नाही.

१०) कंत्राटदार अटी व शर्ती नुसार कंत्राट चालविण्यास असमर्थ ठरल्यास त्यास दंडासह त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

११) उपहारगृह चालवित असतांना कंत्राटदारास बंधनकारक असलेल्या बाबींचे उल्लंघन झाल्यास खालील प्रमाणे दंड आकरण्यात येईल.

| अ.क्र. | बाबींचा तपशिल | आकारण्यात येणा-या दंडाची रक्कम |
|---|---|---|
| १) | तक्रार /सुचना नोंदवही न ठेवणे | रू. १००/- प्रति दिवस |
| २) | पदार्थात कुठलाही किटक आढळणे | रू. १००/- प्रति घटना |
| ३) | पदार्थात प्लॅस्टीक /केस/ दोरी / कपडा आढळणे | रू. १००/- प्रति घटना |
| ४) | पदार्थात दगड/खडे २ मिमी पेक्षा मोठे आढळणे | रू. १००/- प्रति घटना |
| ५) | अस्वच्छ भांडी / उपहारगृहपरिसर | रू. १००/-प्रति दिवस |
| ६) | कच्चे / न शिजवलेले/ बेचव अन्न आढळणे | रू. १००/- प्रति दिवस |
| ७) | कामगारांची अस्वच्छता व असभ्य वर्तन | रू. २००/- प्रति कामगार |

उपरोक्त बाबीं शिवाय उपहारगृहाचा दर्जा विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अपायकारक आढळल्यास मा. प्राचार्य यांनी नियुक्त केलेली समिती त्याची तपासणी करून मा. प्राचार्य त्याची शहानिशा करून कंत्राटदारावर उचित दंडात्मक कारवाई करतील. वरील बाबींचे उल्लंघन दुस-यांदा, तिस-यांदा इ. वेळा झाल्यास दंडाची

रक्कम दुप्पट, तिप्पट याप्रमाणे वाढत जाईल व वारंवार सदर बाबी निदर्शनास येत असल्यास सदर कंत्राट तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

१२) उपरोक्त अटी व शर्ती संबंधी काही वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधी महाविद्यालय प्रशासनाचा निर्णय अंतिम व कंत्राटदारास बंधनकारक राहील. तसेच उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल / सुधारणा करण्याचा पुर्ण हक्क महाविद्यालय प्रशासनाने राखून ठेवला आहे.

१३) उपहारगृहात खालील प्रमाणे दर्जा (ब्रॅन्ड) असणारे विविध प्रकारचे धान्य / पदार्थ वापरण्यात यावेत.

| अ.क्र. | पदार्थाचा तपशिल | पदार्थाचा दर्जा (ब्रॅन्ड) |
|---|---|---|
| १ | गहू | १४७, शरबती किंवा तत्सम प्रतीचे |
| २ | तांदूळ | कोलम , एचएमटी, इंद्रायणी किंवा तत्सम प्रतीचे |
| ३ | खाद्यतेल (रिफाइनड) | सनफलॉवर / सोयाबीन किंवा तत्सम प्रतीचे |
| ४ | मीठ | टाटा, शुध्द, अन्नपुर्णा किंवा तत्सम प्रतीचे |
| ५ | सर्व प्रकारच्या दाळी | चांगल्या प्रतीच्या |
| ६ | मसाले | एमडीएच, एव्हरेस्ट, सुहाना किंवा तत्सम प्रतीचे |

१४) वर्षभरातील केलेल्या कामाचे मुल्यमापन करुन पुढील वर्षी उपहारगृह चालविण्याकरीता देता येईल.

१५) कंत्राटदाराने उपहारगृह स्वत:चालविणे बंधककारक राहील.उपकंत्राटदार नेमता येणार नाही

१६) लिफाफा क्र. १ मधील आवश्यक कागदपत्राचे गरज भासल्यास कमी/अधिक करण्याचे अधिकार संस्थाप्रमुख/समीतीने राखून ठेवले आहे.

१७.हिवाळी व उन्हाळी सुट्टी मध्ये उपहारगृह बंद राहिलेल्या ५० टक्के भाडे आकारण्यात येईल.

टिप - वरील तक्यात नमुद केलेल्या ज्या वस्तु/पदार्थांचा दर्जा (ब्रॅंड)नमुद केलेला नाही ते पदार्थ महाविदयालय प्रशासनाच्या संमतीने ठरवुन वापरावे.

03/09/2021

(डॉ. सुहास सुधाकरराव गाजरे)
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव

## इतर आवश्यक माहिती

१)कंत्राटी पध्दतीने उपहारगृह चालविण्या संबंधीच्या सर्व अटी व शर्ती मान्य असतील तरच कंत्राटदाराने निविदा भरावी. स्विकृत झाल्यास कंत्राटदारांना वरील प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्या बाबतचा करारनामा रू. १००/- (अक्षरी - रू. शंभर फक्त) किंवा नियमानुसार आवश्यक च्या स्टॅम्प पेपरवर नोटरीसमोर करून द्यावा लागेल. त्यानंतरच प्राचार्यांकडून उपहारगृहाचे कंत्राट देण्या बाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

२) सदर कंत्राटी संबंधीच्या निविदा महाविद्यालयात रू. ५००/- भरुन उपलब्ध होतील किंवा महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरुन डाउनलोड करून भरल्यास रू. ५००/- इतक्या रक्कमेचा धनाकर्ष प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव यांच्या नावाने व जळगांव येथे देय असलेला काढून निविदे सोबत जोडावा. उपरोक्त निविदा रक्कम नापरतावा असेल.

३) सदर कंत्राटा संबंधीच्या निविदा दोन स्वतंत्र लिफाफयात दि. २२.०१.२०२५ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहे. विहीत मुदतीच्या नंतर प्राप्त निविदा ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

| | |
|---|---|
| लिफाफा क. १ | Part A– कंत्राटदाराची माहिती व संबंधित प्रमाणपत्रांचा लिफाफा. |
| लिफाफा क. २ | Part B– दरपत्रक |

४) उपहारगृहातील पदार्थ/पेय यांचे अपेक्षित आधारभूत दर महाविद्यालयाच्या प्रशासनाने ठरविलेला असुन, तो गोपनीय राहील. त्या दराच्या तुलनेत निविदेतील नमुद दर ५ टक्क्यांपेक्षा कमी असल्यास अशा निविदा अपात्र ठरविण्यात येतील.

५) सदर निविदा दिनांक २३.०१.२०२५ रोजी सायंकाळी ३.०० वा. फक्त लिफाफा Part A उघडण्यात येईल व सदर कागदपत्रांची पुर्तता करणा-या कंत्राटदारासच पुढील प्रक्रियेस (Part B) पात्र ठरविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

६) उपहारगृहाचे कंत्राट देण्यापूर्वी / निविदा पात्र करण्यापूर्वी Part A मधील कागदपत्रांची पुर्तता, पुर्वानुभव, कामाचा दर्जा व नमुद दर या व्यतिरिक्त आवश्यकता असल्यास त्यांना पूर्व पात्रतेच्या सादरीकरणास बोलविण्यात येईल.

७) प्राप्त झालेल्या सर्व निविदा कोणतेही कारण नमुद न करता नाकारण्याचा तसेच सदर निविदा प्रक्रिया कधीही कोणत्याही कारणा शिवाय / पुर्वसुचनेशिवाय स्थगित करण्याचे पुर्ण अधिकार महाविद्यालय राखून ठेवत आहे. या सर्व प्रक्रिये दरम्यान प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव यांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक राहील.

लिफाफा १ (PART-A)

कंत्राटदारांनी निविदा भरतांना खालील नमुन्यात आवश्यक ती माहिती भरुन त्यासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती सोबत जोडाव्यात.

**माहितीचा नमुना :**

| अ.क्र. | कंत्राटदाराचा तपशिल | |
|---|---|---|
| १ | कंत्राटदाराचे संपूर्ण नाव | |
| २ | संपुर्ण पत्ता पिनकोडसह | |
| ३ | दुरध्वनी कमांक / भ्रमणध्वनी कमांक | |
| ४ | अनुभवाचा तपशिल (मागील दोन वर्षाचा कंत्राटाचा तपशिल) | |
| ५ | यापूर्वी कंत्राट रद्द झाला असल्यास त्याची कारणे | |
| ६ | सद्यस्थितीत दुस-या इतर ठिकाणी उपहारगृहाचे कंत्राट सुरू असल्यास त्याचा संदर्भ व तपशिल द्यावा | |
| ७ | मागील तीन वर्षाचा आर्थिक उलाढाली संबंधीचा तपशिल | |
| ८ | धनाकर्षाचा तपशिल | |
| ९ | अ) दुकान अधिनियम परवाना नोंदणी कमांक व दिनांक<br>ब) अन्न व सुरक्षा विभागाचा परवाना | |
| १० | PAN card / CST / VAT / Aadhar Card/ EPIC . कमांक | |

मी ........................................................... असे घोषित करतो की, निविदेत नमुद केलेल्या सर्व अटीव शर्ती मला मान्य असुन त्यानुसांर उपहारगृहाचे कंत्राट घेण्यास मी इच्छूक आहे.

दिनांक-

स्थळ-कंत्राटदाराचे नाव व सही

**लिफाफा १ क्र.१ मध्ये सादर करण्याची सियीरल नंबर नुसार कागदपत्रे सोबत जोडावायाची आवश्यक कागदपत्रे**

कंत्राटदाराने खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती निविदा सोबत जोडाव्यात. तसेच निविदा सादर करतांना सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर कंत्राटदाराची सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

१) दुकान अधिनियम परवाना नोंदणी प्रमाणपत्र.

२) अन्न व सुरक्षा विभागाचा परवाना.

*३) PAN card / CST / VAT / Aadhar Card/ EPIC*

४) निवदा धारकांची सन २०२१ -२२, २०२२-२३, २०२३-२४ या पैकी कोणत्याही एका अथवा सर्व वर्षाची उलाढाल रक्कम रु ४०,००,०००/- (चाळीस लाख रूपये) मात्र किंवा त्यापेक्षा जास्त असले बाबतचे चार्टर्ड अकॉउटंट यांचे कडुन प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.

५) मागील तीन वर्षाची निविदा धारकांची २०२१-२२ ते २०२३-२४ या वर्षाची बॅलन्सशीट, प्रॉफीट ॲन्ड लॉस स्टेटमेंट ची छायाकींत प्रत.

६) किमान ४ कामगाराचा Insurance Policy (अपघाती विमा संरक्षण). पॉलीस निविदाच्या तारेख्याच्या अगोदरची असणे आवश्यक आहे.

७) निवदा धारकास शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकलेला नाही याबाबत निविदाधारकाने प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८) सहकारी संस्था आसल्यास ठरावाची प्रत ,संस्थांना निविदा भरावयाची असल्यास त्यांनी सहायक निबंधक सहकारी संस्था यांचे मा.प्राचार्य शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगांव यांचे नावाने अनुमती पत्र जोडणे आवश्यक आहे.लागू असल्यास

९) संस्था चालकाचे अदयावत पोलीस चारीत्र पडताळणी दाखला सन.२०२४ चा असणे आवश्यक आहे.

१०) याव्यतिरिक्त सक्षम अधि-यांकडून प्राप्त केलेले इतर आवश्यक प्रमाणपत्रे

<u>टिप</u>- उपरोक्त नमुद केलेल्या कागदपत्रांची प्रर्तता होत नसल्यास अशा निविदा तात्काळ रदद करण्यात येईल. .

लिफाफा २ (PART - B)

दरपत्रक

| अ.क्र. | तपशिल | दर( प्रति नग/थाळी ) |
|---|---|---|
| १ | समोसा | |
| २ | साधी कचोरी | |
| ३ | कांदा कचोरी | |
| ४ | खमंग ढोकला | |
| ५ | फाफडा | |
| ६ | डोसा (साधा/मसाला/पेपर/चीझ) | |
| ७ | वडापाव/पाववडा | |
| ८ | पोहे | |
| ९ | रगडा | |
| १० | पफ | |
| ११ | रसा वडा | |
| १२ | भजी १००ग्रॅम (मुंग/कांदा/बटाटा) | |
| १३ | मिसळ पाव | |
| १४ | पराठा(आलु/मेथी) | |
| १५ | भेळ | |
| १६ | इडली सांबर | |
| १७ | वडा सांबर | |
| १८ | उत्तपा | |
| १९ | साबुदाणा १००ग्रॅम (खिचडी/वडा) | |
| २० | आम्लेट | |
| २१ | पाणीपुरी (१० पुरी) | |
| २२ | दहीपुरी | |
| २३ | पावभाजी | |
| २४ | दाबेली | |
| २५ | पिज्जा | |
| २६ | फ्रेंच फ्राइसेस | |
| २७ | सॅडविच | |
| २८ | बरगर | |
| २९ | पुरी भाजी (५ पुरी) | |
| ३० | पोळी भाजी (३ पोळी) | |
| ३१ | राईस प्लेट | |
| ३२ | मॅगी /पास्ता | |
| | | |

| पेय | | |
|---|---|---|
| १ | चहा( साखरयुक्त/साखरविना) | |
| २ | ग्रीन टी | |
| ३ | कॉफी (हॉट/कोल्ड) | |
| ४ | शुध्द दुध | |
| ५ | ज्युस (अननस/मोसंबी/संत्री/आंबा/सफरचंद/टरबुज) | |
| ६ | लिंबु शरबत (फुल/हाप ग्लास) | |
| ७ | नमांकीत कंपनीचे कोल्ड ड्रींक / आईसक्रीम | MRP नुसार |
| ८ | ऊसाचा रस ( बर्फयुक्त/बर्फविना-फुल/हाफ) | |
| ९ | नमांकीत कंपनीचे बीस्कीट व पॅक्ड फुड पॅकेट | MRP नुसार |
| १० | पाणी बॉटल (बिसलेरी/किनले/रॉयलअॅक्वा २५०/५००/१०००मिली) | |
| ११ | ईतर | |
| १२ | | |
| १३ | | |
| १४ | | |
| १५ | | |

**वरील दर सर्व करांसहीत असुन, ते पुढील एक वर्षा करिता वैध राहतील.**

मी ......................................................... असे घोषित करतो की, निविदेत नमुद केलेल्या सर्व अटीव शर्ती मला मान्य असुन त्यानुसार वरील दराप्रमाणे उपहारगृहाचे कंत्राटघेण्यास मी इच्छूक आहे.

दिनांक-

स्थळ-कंत्राटदाराचे नाव व सही